| | |
|---|---|
| MHWS090002472014 | दाखल दिनांक : ०५.०७.२०१४<br>नोंदणी दिनांक : ०५.०७.२०१४<br>निकाल दिनांक : २७.०३.२०२६<br>कालावधी : **११** व., **०८.**, **२२** दि. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. ८४/२०१४** **निशाणी क्र.– ११०**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : १८/२०१४

पोलीस स्टेशन : आसेगांव पोलीस स्टेशन, आसेगांव.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, आसेगांव तालुका पोलीस स्टेशन, आसेगांव. |
| अभियोगपक्षातर्फे | वि.स.स.अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | डिगांबर पांडूरंग टिपरे व इतर |
| आरोंपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री.पी. एन. चौधरी |

**<u>गुन्हयाचा तपशिल</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०९/०६/२००८ ते ११/०३/२०१४ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ११/०३/२०१४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०२/०७/२०१४ |
| दोषारोप निश्चित तारीख | १४/०८/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०८/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br><br>४.<br>५. | **डिगांबर पांडूरंग टिपरे (फरार)**<br>वय : ३५ वर्षे, धंदाः नोकरी<br>**पांडूरंग राजाराम टिपरे (मयत)**<br>**लिलाबाई पांडूरंग टिपरे(मयत)**<br>आ.क्र.१ ते ३ रा. पाळोदी, ता.मानोर, जि.वाशिम.<br>**सुदरबाई पुंडलीक हळसे**<br>वय : २८ वर्षे, धंदाः नोकरी<br>**पुंडलीक शामराव हळसे**<br>वय :३२ वर्षे, धंदाः शेती<br>आ.क्र.४ व ५ रा. लाखी, ता. पुसद, जि.यवतमाळ. | २३/०६/ २०१४ | २३/०६ /२०१४ | भा.दं.वि. चे कलम ४९८ (अ) सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले | -- | -- |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक २७/०३/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८-अ सह कलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

**२.** फिर्यादी नामे सौ. संगिता डिगांबर टिपरे ही आ.क्र.१ ची पत्नी असुन इतर आरोपी हे आ.क्र.१ चे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आ.क्र.१ सोबत दि. ०९/०६/२००८ रोजी झाले. लग्नानंतर आरोपींनी दोन वर्षापर्यंत तिला चांगली वागणुक दिली. त्यानंतर तिला आ.क्र.१ पासून सारंग नावाचा मुलगा झाला. आ.क्र.१ हे सि.आर.पी.एफ मध्ये नौकरीला असल्यामुळे ते सुरुवातीला ते चार महिन्यातून एक महिन्याच्या सुट्टीवर यायचे. आ.क्र.१ हे परत गेल्यानंतर इतर आरोपी हे फिर्यादीला घरातील शुल्लक कारणावरुन तिला त्रास देत होते.

व तिचे सासु सासरे माहेरवरुन एक लाख रुपये घेवून येण्यास कारणावरुन तिचा मानसिक च शारिरीक छळ करीत होते. आ.क्रग.४ व ५ हे आ.क्र.१ ला फिर्यादीबद्दल भडकावून देत होते व त्यामुळे आ.क्र.१ हे फिर्यादीला माहेरवरुन पैसे आणण्यासाठी तगादा लावित होते. तसेच तिच्यावर संशय घेत होते व दारु पिवून तिला मारहाण करीत होते. त्या अनुषंगाने दि.११.०३.२०१४ रोजी फिर्यादीने आसेगांव पोलिस स्टेशन येथे जबाणी तक्रार दिली.

३. पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र.१८/२०१४ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार करुन साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आ.क्र.१ याचेविरुद्ध वारंवार वॉरंट व प्रोक्मेमेशन काढूनही अभियोगपक्ष सदर आरोपीस चौकशीकामी हजर करण्यास असमर्थ ठरले. म्हणून प्रकरण आ.क्र.१ च्याविरुद्ध गैरहजेरीत चालविण्यात आले. तसेच प्रकरण प्रलंबित असतांना आ.क्र.२ व ३ मरण पावले असल्याने त्यांचेविरुद्ध प्रकरण अबेट करण्यात आले. आ.क्र.४ आणि ५ यांचेविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४९८–अ सहकलम ३४ अन्वये नि.क्र.८७ वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी निशाणी क्र. ८८ व ८९ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण चार साक्षीदार, सा.क्र.१ संगिता डिगांबर टिपरे (फिर्यादी) यांना नि.क्र.९३ वर, सा.क्र.२ भिमराव राघोजी कळंबे (साक्षीदार) यांना नि.क्र.९८ वर, सा.क्र.३ सिंधुबाई भिमराव कळंबे (साक्षीदार) यांना नि.क्र.१०० वर व सा.क्र.४ गणेश तुकाराम भोयर (दाखल अधिकारी) यांना नि.क्र.१०३ वर तपासले आहे. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठलेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्यानंतर आ.क्र.४ व ५ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नि.क्र.१०८ व १०९ वर नोंदविण्यात आले.

**५.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वि.स.अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादीने तिच्या साक्षेमध्ये पुरक असा पुरावा दिलेला आहे. याउलट आरोपींचे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीची साक्ष आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्ध करण्यास पुरेशी नाही. प्रस्तुत आरोपींचा गुन्ह्यात कोणताही सहभाग नाही. त्यामुळे वर नमुद कलमांकरीता आरोपींना दोषी ठरविता येणार नाही.

**६.** सरकार पक्षाचे हकीकत व आरोपींचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, लग्नानंतर ते दि.११/०३/२०१४ चे तक्रार दाखल करेपर्यंत ग्राम–पाळोदी, ता. मानोरा, जि.वाशिम येथे आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी संगिता दिगांबर टिपरे हिचेकडे रुपयाची मागणी करुन तिचा शारिरीक, मानसिक छळ करुन तिला क्रुर वागणुक दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ) सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

**७.** सा. क्र. १ संगिता ही या प्रकरणातील मुळ फिर्यादी साक्षीदार आहेत. त्यांनी नि.क्र.९३ वर असे कथन केले की, आ.क्र.१ सोबत तिचे लग्न दि.०९/०६/२००८ रोजी झाले होते. लग्नानंतर ती आरोपींच्या घरी राहावयास गेली होती. त्यावेळेस तेथे सर्व आरोपी राहत होते. आरोपी दोन ते चार वर्ष चांगले राहीले व त्यानंतर आ.क्र.२ व ३ तिच्यासोबत

भांडण करीत होते व आ.क्र.१ सुट्टीहून परत आल्यानंतर आ.क्र.२ ते ५ त्यांच्यामध्ये भांडण लावून देत होते व तिला मारण्यास प्रवृत्त करीत होते. त्यामुळे आ.क्र.१ तिला केस धरुन लाथा–बुक्याने व बेल्टने मारहाण करीत होते व रुपये एक लाख वेगळे घर बांधण्यासाठी मागणी करीत होते. दि.०१/०५/२०१३ रोजी फिर्यादीचा भाउ तिला सोडण्यास गेला असता आ.क्र.१ ने त्याचेसोबत भांडण केले व त्यांना रुपयांची मागणी केली. त्यानंतर फिर्यादीने नि.क्र.९४, ९५ व ९६ प्रमाणे तक्रार दाखल केली.

८. सा.क्र.२ भिमराव यांनी असे कथन केले की, आ.क्र.१ फिर्यादीला घर बांधण्यासाठी एक लाख रुपयांची मागणी करीत होते. त्यांचेकडे रुपये नसल्याने आरोपी तिला मारहाण करुन माहेरी पाठवून देत होते. ते तिला समजावून सासरी पाठवत होते. सा.क्र.३ सिंधुबाई यांनी असे कथन केले की, आरोपींनी फिर्यादीसोबत दोन वर्षानंतर भांडण केले होते. आ.क्र.२, ४ व ५ यांनी तिला मारहाण केली होती व रुपये एक लाख घर बांधण्यासाठी मागणी केली होती. आरोपी तिला माहेरवरुन रुपये आणण्यासाठी त्रास देत होते. सा.क्र. २ व ३ यांनी त्यांच्या साक्षेत मान्य केले की, आ.क्र.४ आणि ५ यांची फिर्यादीच्या संसारात ठवळाठवळ नव्हती.

९. सा.क्र.४ गणेश प्रकरणातील दाखल अधिकारी असून त्यांनी असे कथन केले की, त्यांनी दि.११/०३/२०१४ रोजी त्यांनी कथित घटना अहवाल नि.क्र.९६ लिहीला होता. त्यावरुन पुढे गुन्हा दाखल होवून प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला होता.

१०. अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीने कथन केलेल्या घटनेस दुजोरा मिळणेहेतु सा.क्र.२ व ३ वगळता इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आला नाही. अभियोगपक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांनी प्रकरणातील दाखल अधिकारी व तपास अधिकारी यांना साक्षकामी हजर केलेले नाही.

फिर्यादीच्या पुरक पुराव्या अभावी तसेच योग्य कागदोपत्री पुराव्या अभावी कथित घटना आ.क्र.४ व ५ चे विरुद्ध सिद्ध झालेली नाही.

**११.** तसेच फिर्यादीने कथित मारहाण व दुखापत झालेबाबत पुरक वैद्यकिय दस्त अभिलेखावर दाखल करण्यात आले नाही. अभियोग पक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांनी इतर स्वतंत्र साक्षीदार यांना साक्षकामी हजर केले नाही. तसेच फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या पुरक पुराव्याअभावी आरोपींनी फिर्यादीस कथित त्रास, मारहाण करुन तिला क्रुर वागणुक देवून रक्कमेची मागणी केल्याची बाब सिद्ध झालेली नाही.

**१२.** अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन कथीत घटनेचे दिवशी व वेळी आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी हिचेकडे रुपये दोन लाखची मागणी करुन तिची शारिरीक व मानसिक छळ करुन मारहाण केली व जीवाने मारण्याची धमकी दिल्याची बाब फिर्यादी व इतर साक्षीदारांचे पुरक पुराव्या अभावी सिद्ध झालेली नाही. गुन्ह्याचे घटक सिद्ध करण्याइतपत पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील दोष सिद्ध करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबतः–</u>**

**१३**. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ) सह कलम ३४ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.२ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी क्र.४ **सुंदरबाई पुडलीक हळसे** व आ.क्र.५ **पुंडलीक शामराव हळसे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ सहकलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आ.क्र.१ डिगांबर पांडूरंग टिपरे यास प्रकरणातून दोषमुक्त करण्यात येते.

३. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.04.01 17:26:39 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**

दि. २७/०३/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
( न्यायालय क्र.२), मानोरा,

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | – | Smt. R. K. Chavhan (Grade–III) |
| Court | – | (Stm. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | – | 27/03/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | – | 27/03/2026 |
| Judgment/Order uploaded on | – | 01/04/2026 |